**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 2, Feb- 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 03/02/2021 Accepted on : 18/02/2021 Publication Date: 25/02/2021

# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या करिअर निवडीसाठी अविरत प्रशिक्षणाची उपयुक्तता : एक अभ्यास

**[1] शंकर व्यंकटराव कंचनवार, [2] डॉ.शोभना विश्वनाथ जोशी**
**[1] संशोधक, शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद**
Email - kanchanwar93@gmail.com
**[2] मार्गदर्शक, विभाग प्रमुख (शिक्षणशास्त्र विभाग) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद**

***Abstract:*** देशाचा विकास हा त्या देशातील सुशिक्षित, सुजाण व सुसंस्कृत मनुष्यबळावर अवलंबून असतो. मानव संपत्ती जेवढी सकस, सुविद्य ओ सुसंस्कृत तेवढी देशाच्या विकासाची गती अधिक टिकाऊ असते. देशाच्या मनुष्यबळावच्या जडणघडणीत आणि देशाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीत शिक्षणाचा वाटा फार महत्वपूर्ण आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या विकासाबरोबरच शिक्षण व्यवस्थेच्या संदर्भातही अनेक स्तरावर प्रचार, प्रसार व्हावा यासाठी प्रयत्न चालू आहेत. शिक्षण ही विद्याविषयक उच्च साधना आहे. त्या साधनेमुळे मानवाला सत्याचा शोध घेऊन जीवन विकास सातत्याने साधण्याची स्फूर्ती मिळते. आधुनिक कालखंडात जागतिकीकरणाचे आव्हान इतर सर्वच क्षेत्राप्रमाणे शिक्षण क्षेतातही उभे आहे. देशाच्या विकासासाठी देशाचे मनुष्यबळ सक्षम असणे गरजेचे आहे. गुणवत्तेच्या सार्वत्रिकीकरणासाठी व्यक्तिगत सक्षमता महत्वाची आहे. व्यक्तिगत सक्षमतेतूनच सामाजिक सक्षमता निर्माण होण्यास मदत होते. सामाजिक सक्षमताच सक्षम बांधणीचा देश बनवू शकते.

शासनाने औपचारिक शिक्षणासोबतच पर्यायी शिक्षणाच्या अनेक सुविधाही उपलब्ध केलेल्या आहेत. भौतिक सुविधा उपलब्ध असल्यातरी शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्याला अध्ययन अनुभव देणारा शिक्षक सक्षम असला पाहिजे. शिक्षकाची व्यावसायिक क्षमता वाढली पाहिजे. शिक्षकाचा सतत येणाऱ्या नवनवीन अध्ययन तंत्राशी, पद्धतीशी परिचय झाला पाहिजे- शिक्षण क्षेत्रातील नवनवीन विचार, प्रवाहांची माहिती झाली पाहिजे ज्यामुळे शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमतेचे दृदिकरण होण्यास मदत होईल. यासाठी शिक्षण प्रकीयेतील महत्वाचा घटक, दुवा म्हणजे शिक्षक तर त्या शिक्षकाचे प्रशिक्षण होणे, उद्बोधन होणे गरजेचे आहे. शिक्षण प्रक्रियेत शिक्षकाला महत्वाची भूमिका बाजवावयाची असते. शिक्षण प्रक्रियेचे यशापयश त्यांच्यावर अवलंबून असते म्हणून शिक्षकांच्या प्रशिक्षणाची गरज भासू लागली. शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी विविध स्तरावर काम करणाऱ्या शिक्षकांना सेवापूर्व, सेवांतर्गत शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन व श्यामची आई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद पुणे (mscert) यांनी सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास (अविरत) प्रशिक्षण सन २०१७-२०१८ पासून महाराष्ट्रातील अनुदानित व शासकीय माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यासाठी कोणत्याही वेळेची, ठिकाणाची, भौतिक सुविधेच्या मर्यादा न ठेवता ओंनलाइन पद्धतीने प्रशिक्षण सुरु केले आहे हे प्रशिक्षण दरवर्षी ३० दिवसाचे असून मोबाईल व संगणकाच्या साह्याने करता येणार आहे.

आधुनिक जीवन शैलीत किशोरवयीन मुलांच्या समस्या सोडविण्यासाठी शिक्षकात नविन दृष्टीकोन निर्माण करणे, विद्यार्थ्यांचा ताणतणाव कमी करतांना मानसशास्त्रीय विश्लेषणातून विवेकनिष्ठ उपचार पद्धती अवलंबणे हा उद्देश अग्रभागी आहे. व्यक्तीच्या भावना आणि वर्तनामध्ये दीर्घकाळ टिकणारे परिवर्तन घडवून आणून आनंददायी जीवन कसे जगता येईल याचे मार्गदर्शन या प्रशिक्षणातून शिक्षकांना करण्यात येत आहे.

सदरचे प्रशिक्षण घेणाऱ्या तज्ञ शिक्षकांना विशेष महत्व असून प्रशिक्षित शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मदत करतांना सुलभकाची अपेक्षित असल्याने मानसशास्त्रीय कसोट्यांचे प्रशिक्षण दिले जात आहे. त्याच बरोबर विद्यार्थ्यांच्या करिअर निवडीसाठी योग्य असे मार्गदर्शन मिळणार आहे.

विद्यार्थ्यांचा भाषिक, तार्किक, सांख्यकीय व अवकाशीय अभिक्षमतांचा विकास कसा साधणार ? त्याचे विकसन कसे करावे ? विद्यार्थ्यांची आवड, स्वप्न, छंद, क्षमता व कौशल्य कसे कसे ओळखावे ? महाकरिअर मित्र पोर्टल, म्यजिक फ्रेमवर्क साईड, म्यागझीन्स ई. ऑनलाइन कसे शोधावे ? त्याच बरोबर त्यांचे समुपदेशन कसे करावे ? ई. प्रश्नांची उकल करण्यासाठी सदरचे प्रशिक्षण असून त्याचा उपयोग प्रशिक्षित शिक्षक त्यांच्या विद्यार्थ्यांना कसे देतात हे पहाणे आवश्यक वाटते.

***Key Words:*** **संकेत शब्द** ;
1) करियर : स्वतःची आवड व क्षमता ओळखून गुणवत्तापूर्ण सर्वांगीण प्रगती.
2) अविरत प्रशिक्षण : सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास प्रशिक्षण.
3) उपयुक्तता : उपयोग कसा केला जातो.
4) अभ्यास : माहिती जमा करून त्याचे तथ्य जाणून घेणे.
5) संशोधन : नविन ज्ञान प्राप्त करण्यासाठी केलेला सुव्यवस्थित प्रयत्न.

**INTRODUCTION:** शिक्षक व्यासंगी असावा. आपल्या ज्ञानाच्या कक्षा त्याने विस्तारीत कराव्यात. सातत्याने विस्तारित होणाऱ्या ज्ञानाच्या कक्षा आणि त्यामुळे शिक्षण क्षेत्रात सतत निर्माण होणारी आव्हाने समर्थपणे पेलण्याची क्षमता शिक्षकात यायला हवी. तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याची क्षमता ए कार्यप्रेरणा त्यांच्यात वृद्धींगत व्हायला हवी.

विद्यार्थ्यांची वाढती जिज्ञासू वृत्ती व त्यांची ज्ञानलालसा तृप्त करू शकणारा शिक्षक हि काळाची गरज आहे. गतिमान व परिवर्तनशील अशा जीवन प्रवाहात सफल ठरेल असे नवे नागरिक घडविणाऱ्या शिक्षकांनी केवळ संचयित ज्ञान आणि पारंपारिक तंत्रे यावर विसंबून चालणार नाही. शिक्षकाला प्रगतीशील ठेवण्यासाठी सतत साथ करू शकेल ते खरे प्रशिक्षण.

म्हणून तर महाराष्ट्र शासन व श्यामची आई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद पुणे (mscert) यांनी सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास (अविरत) प्रशिक्षण सन २०१७-२०१८ पासून महाराष्ट्रातील अनुदानित व शासकीय माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यासाठी सुरु केले आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश शिक्षकांच्या प्रशिक्षणातून वियार्थ्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे द्यावे हे या प्रशिक्षणाच्या माध्यमातून दिले जात आहे. एव्हढेच नव्हे तर विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच त्यांच्या भावी जीवनासाठी करिअर निवडीच्या संधी देखील उपलब्ध करून देल्या जात आहेत. विद्यार्थ्यांच्या करिअर निवडीसाठी शिक्षकांनी काय काय करावयाचे आहे याचे प्रशिक्षण दिले जाते.

**LITERATURE REVIEW: संबंधित साहित्याचा आढावा**

मराठवाड्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रशिक्षानार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास .
**संशोधक** राजेश माणिकराव चौधरी **मार्गदर्शक** डॉ. आनंद माधवराव वाघ
संशेधन वर्ष : एप्रिल २०१७
विद्यापीठ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

माध्यमिक शिक्षक सेवांतर्गत प्रशिक्षणाचा शिक्षकांच्या अध्यापन क्षमता विकासावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास.
**संशोधक** अशोक बंडूजी भोसले **मार्गदर्शक** डॉ. एस. आर. वाजे संशोधन वर्ष २०११
विद्यापीठ : पुणे विद्यापीठ, पुणे.

**MATERIALS: प्रश्नावली व मुलाखत प्रशिक्षणाच्या उपयुक्तता अभ्यासण्यासाठी**

**METHOD:** प्रस्तुत संशोधनासाठी बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या 56 माध्यमिक शाळेतील मुखाध्यापक, माध्यमिक शिक्षक व इयत्ता दहावी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची जनसंख्या विचारात घेण्यात आलेली होती कार्यवाहीचे टप्पे खालीलप्रमाणे आहेत माहिती संकलनासाठी प्रश्नावली व मुलाखत हे साधन तयार करण्यात आले. बिड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेतील अविरत प्रशिक्षण पूर्ण केलेले ५६ मुखाध्यापक, ११२ माध्यमिक शिक्षक व इयत्ता दहावी वर्गात शिकणारे २८० मुले व २८० मुलींची निवड सुगम यादृच्छिक पद्धतीने करण्यात आली. मुखाध्यापक यांच्यासाठी मुलाखत तर शिक्षक व विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेतली. प्राप्त माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण केले. प्रस्तुत माहिती सर्वेक्षण पद्धती द्वारे गोळा करण्यात आली.

**DISCUSSION:** प्रस्तुत संशोधन हे विद्यार्थ्यांच्या करिअर निवडीसाठी अविरत प्रशिक्षणाची उपयुक्तता तपासण्यासाठी करण्यात आले आहे यामध्ये विद्यार्थ्यांना करिअर संबंधी उपलब्ध संधी, कोर्सेस, शिक्षकांनी विद्यार्थ्यांतील आवड, क्षमता, कल, क्षमता व कौशल्य ओळखून त्यांना शिक्षक मार्गदर्शन कसे करतात, मुख्याध्यापक त्यांना कसे सहकार्य करतात हे प्रश्नावली द्वारे तपासण्यात आले. सर्वेक्षण पद्धतीने गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण तसेच अर्थनिर्वचन करण्यात आले.

**ANALYSIS: विश्लेषण** : प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थिनी बरोबरच शिक्षक व मुख्याध्यापक यांचा अविरत प्रशिक्षणाच्या उपयुक्ततेचा अभ्यास करण्यात आला त्यामध्ये असे आढळून आले की करिअरच्या बाबतीत विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा दृष्टिकोन सारखाच आहे त्याच बरोबर त्यांना करिअर निवडीसाठी शिक्षक व मुख्याध्यापक हे नेहमी मार्गदर्शन व समुपदेशन करतात. माहितीचे अर्थनिर्वचन करून विश्लेषणावरून निष्कर्ष निघाले त्याची मांडणी केली त्याचबरोबर शून्य् परिकल्पना विचारात घेतली. विश्लेषणावरून असे दिसते की विद्यार्थी हि स्वतःच्या भावी करिअर बाबतीत उत्साही आहेत तर शिक्षक व मुख्याध्यापक त्यांना वेळोवेळी मदत करतात. यामुळे विद्यार्थी स्वतःच्या भावी करिअरबरोबरच व्यक्तिमत्त्व आणि एकूणच सर्वांगिण विकास सुध्दा साधला जातो. म्हणून अविरत प्रशिक्षण हे उपयुक्त आहे.

**FINDINGS:** प्रमुख निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत

1) स्वतःच्या करिअर बाबतीत १० वी वर्गातील विद्यार्थ्यां पेक्षा विद्यार्थिनी उत्साही आहेत.
2) माध्यमिक शिक्षक हे विद्यार्थ्यांतील भाषिक, तार्किक, सांख्यिकीय व अवकाशीय क्षमता विकसनासाठी प्रयत्न करतात.
3) माध्यमिक शिक्षक व मुख्याध्यापक हे विद्यार्थ्यांच्या करिअर बाबतीत मार्गदर्शन व समुपदेशन करतात.

4) विद्यार्थ्यांना म्यझिक फ्रेमवर्कचा करिअर निवडण्यासाठी उपयोग होताना दिसतो.
5) ८० % शिक्षकांच्या मते अविरत प्रशिक्षण हे करिअर संबंधी अत्यंत उपयुक्त आहे.

**RESULT:** विद्यार्थ्यांमध्ये कोणतीही गोष्ट स्वीकारण्याची तिच्या मागचा कार्यकारणभाव जाणून घेण्याची क्षमता निर्माण होते. विद्यार्थ्यांच्या करिअर बाबतीत उपलब्ध संधी व कोर्सेस समजून घेण्यास प्रेरित करण्यासाठी विविध उपक्रम तसेच विशिष्ट पध्दतीचे कार्यक्रम आयोजित केले. करिअर निवडतांना विद्यार्थ्यातील आवड. क्षमता, छंद व कौशल्य विकसित करण्यासाठी शिक्षकाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्वतः होऊन करिअरच्या कोणकोणत्या संधी उपलब्ध आहेत हे शोधण्यासाठी विविध वेबसाईट, ई म्यागझीन्स, करिअर बुक्स यांची माहिती झाली. शिक्षक हे स्वतःच्या विचारात परिवर्तन करून विद्यार्थ्यांच्या करिअर बाबतीत गांभीर्याने प्रयत्न करतांना दिसून येतात.

**RECOMMENDATIONS:**

1. विद्यार्थ्यांमध्ये कोणतीही गोष्ट स्वीकारण्याची तिच्या मागचा कार्यकारणभाव जाणून घेण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न व्हावेत.
2. विद्यार्थ्यांच्या करिअर बाबतीत उपलब्ध संधी व कोर्सेस समजून घेण्यास प्रेरित करावे
3. शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी चांगले करिअर करण्यासाठी व्यवसाय मार्दर्शन, सेमिनार व वैयक्तिक समुपदेशन करून त्यांच्यात करिअर निवडीची क्षमता विकसित करणे
4. विद्यार्थ्यांना करिअरच्या नविन संधी व कोर्सेस शोधण्यासाठी शाळेतील संगणक प्रयोगशाळा अद्ययावत करणे.
5. माध्यमिक शिक्षकांनी स्वतःच्या विचारात परिवर्तन करून विद्यार्थ्यांच्या करिअर बाबतीत गांभीर्याने विचार करावा

| अ क्र | शाळा संख्या | मुख्याध्यापक, शिक्षक व दहावी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची जनसंख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मुख्याध्यापक | शिक्षक | मुले | मुली | एकूण |
| १ | जि.प. ५६ शाळा | ५६ | १६८ | १५७१ | १२७४ | ३०६९ |
| २ | नमुना निवडलेल्या शाळा ५६ | ५६ | ११२ | २८० | २८० | ७२८ |

**CONCLUSION:**
प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या करिअर निवडीसाठी अविरत प्रशिक्षणाची उपयुक्तता तपासण्यासाठी करण्यात आले आहे .यामध्ये शिक्षक, मुख्याध्यापक यांचे विद्यार्थ्यांच्या करिअर बाबतीत प्रशिक्षणाची उपयुक्तता कशी आहे तसेच विद्यार्थ्यांतील करिअर साठीच्या क्षमता विकसित करणे त्याच बरोबर विद्यार्थ्यांसाठीच्या नविन करिअरच्या संधी व कोर्सेसची माहिती प्रश्नावली द्वारे जानून घेण्यात आला. सर्वेक्षण पद्धतीने गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण तसेच अर्थनिर्वचन करण्यात आले

**संदर्भ साहित्य :**

1. मुळे रा.श. व उमाटे वि.तु : १९७७ शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर,विलास अंधारे प्रकाशन.
2. देशपांडे लीना : 1999 संशोधन पद्धती सर्वेक्षण पुष्प चौथे, नाशिक, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.
3. भिंतांडे वी.रा. :1988 शैक्षणिक संशोधन ,तृतीय आवृत्ती नूतन प्रकाशन.
4. पंडित बन्सी बिहारी अनिल: शैक्षणिक संशोधन, पुणे नूतन प्रकाशन.